# भारतीय लोकशाही

(समकालीन परिप्रेक्ष्य)

75 भारत अमृत महोत्सव

DEMOCRACY IN INDIA



संपादक

डॉ. संदीप बी. काळे

भारतीय लोकशाही (समकालीन परिप्रेक्ष्य)

■ डॉ. संदीप बी. काळे

■ प्रथम आवृत्ती – २६ नोव्हेंबर,२१

© प्रकाशक व संपादक

■ प्रकाशक

आधार पब्लिकेशन, अमरावती.

हनुमान मंदिराजवळ, पाठ्यपुस्तक मंडळा समोर,

वि.म.वि.कॉलेज मागे, अमरावती

मो. ९५९५५६०२७८

email- aadharpublication@gmail.com

■ मुखपृष्ठ संकल्पना

विलास पवार

सरिता ग्राफिक्स, अमरावती

■ अक्षरजुळवणी

सरिता ग्राफिक्स,

कठोरा रोड, अमरावती

■ Price : 200/-

ISBN-978-93-91305-38-3

सुचना:- सदर अंकामध्ये प्रकाशित झालेल्या लेखास, संपादक, प्रकाशक, मालक, मुद्रक जबाबदार राहणार नाही. या अंकामध्ये प्रकाशित झालेले लेख लेखकाचे त्यांचे वैयक्तिक मत आहे.

# अनुक्रमणिका


| लेख | लेखक | पृ.क्र. |
| --- | --- | --- |
| भारतीय लोकशाही व महिला सक्षमीकरण | डॉ. दिपाली श्रीराम घोगरे | 1 |
| संविधानातील मार्गदर्शक तत्वासंदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा दृष्टीकोण | डॉ.ए.बी.जाधव | 8 |
| शिक्षण व महिला सबलीकरण | श्री पांचाळ देविदास श्रीनिवासराव | 18 |
| आधुनिक भारतीय लोकशाहीच्या वस्तुस्थितीचे अध्ययन | प्रा. सि. के. भोवते | 24 |
| भारतीय संविधानाच्या प्रस्तावनेतील तत्वज्ञान | प्रा. उज्वला रावसाहेब प्रधान | 32 |
| मूलभूत हक्कांचे भारतीय लोकशाहीतील महत्व | देवेंद्रसिंग नरसिंग सोळंके | 42 |
| लोकशाही व मूलभूत कर्तव्य | प्रा.डॉ.उमेशकुमार पी. शहारे | 59 |
| भारतीय संविधानाचे उद्देशिकेचे तत्वज्ञान'' : एक चिकित्सक अध्ययन | डॉ. सुभाष दौलतराव ठपाते | 67 |
| भारतीय लोकशाहीत प्रादेशिक राजकीय पक्षांची भूमिका | प्रा. डॉ. दिनकर संतुकराव कळंबे | 80 |
| भारतीय संविधानातील राज्यनिती मार्गदर्शक तत्व | प्रा. विजय गावंडे | 90 |
| आरोग्य – एक मूलभूत हक्क | प्रा. डॉ. सरला वसंतराव मेश्राम | 97 |

| | | |
|---|---|---|
| 12 | भारतीय लोकशाही व्यवस्थेत न्यायालयीन सक्रियतेची भूमिका **Prof. Pravin Karbhari Shinde** | 104 |
| 11 | लोकशाहीतील सर्वात मोठा अडसर.....जातिवाद<br>**डॉ.राजेंद्र श्री.कोरडे** | 116 |
| 12 | वर्तमानकालीन भारतीय लोकशाही पूढील आव्हाने<br>**डॉ. निहाळ रामदास बाबाजी** | 136 |
| 13 | भारतीय संविधान व संसदीय लोकशाही प्रणाली<br>**प्रा. डॉ. राजेंद्रप्रसाद टी. पटले** | 146 |
| 14 | **महाराष्ट्रातील त्रिस्तरीय पंचायतराज व्यवस्थेचा ७३ व्या घटना दुरूस्तीच्या अनुषंगाने राज्य निवडणूक आयोगाच्या भूमिकेचा अभ्यास श्री. संध्या कृष्णा जगताप / डॉ. प्रमोद पवार** | 152 |
| 15 | भारतीय संविधान आणि मालमत्तेचा हक्क<br>**डॉ.संजय शत्रुघ्न लांडगे** | 175 |
| 16 | भारतीय संविधानाची उद्देशिका तत्वज्ञान व समकालीन आव्हाने **डॉ नवनाथ सोपानराव गायकवाड** | 184 |
| 17 | भारतीय लोकशाहीत प्रसारमाध्यमांची भूमिका<br>**प्रतिक गोकुलदास ठाकरे** | 193 |
| 18 | समकालीन भारतीय लोकशाहीपुढील आव्हाने **डॉ. संदीप बी. काळे** | 202 |
| 19 | भारतीय लोकशाहीच्या प्रगल्भतेसाठी<br>**प्रा.महेश बिऱ्हाडे** | 213 |
| 20 | अकादमिक अनुसंधान का व्यवहारिक आप्लावन<br>**डॉ. डी. एन. प्रसाद** | 226 |

# भारतीय लोकशाहीच्या प्रगल्भतेसाठी

प्रा.महेश बिऱ्हाडे
को.ए.सो.लक्ष्मी शालिनी महिला महाविद्यालय
पेझारी,अलिबाग जिल्हा :रायगड
९४२११६३२०७, birhademahesh77@gmail-com

प्रस्तावना :

लोकशाही हा सध्याच्या जगातील बहुसंख्य देशात लोकमान्य झालेला शासन प्रकार आहे . जगातील अनेक देशांनी आपल्या राजकीय व्यवस्थेसाठी लोकशाहीचा अंगीकार करत असतांना लोकांचे राजकीय जीवन अधिक समृद्ध बनविणे हा उद्देश ठेवला . तरी असे दिसून येते की, २० व्या शतकाच्या उत्तरार्धात लोकशाही स्विकारलेल्या बहुसंख्य देशात जास्तीत जास्त लोकांचा जास्तीत जास्त राजकीय सहभाग व निर्णय प्रकियेत सक्रीय योगदान हा लोकशाहीचा मूळगाभाच नष्ट झाल्याचे दिसते यातील अनेक देशांमधील आज पर्यंतच्या वाटचालीकडे कटाक्ष टाकला असता असे दिसून येते की ,या देशांमध्ये काही कुटुंबे,त्यांच्या वर्चस्वाखालील राजकीय संघटना ,नातेवाईक याचेच प्राबल्य राहिले आहे यामध्ये भारत देश आघाडीवर आहे खऱ्या अर्थाने भारताने १९५० पासून संविधनिक लोकशाहीचा स्वीकार केला, त्यामागे राज्यघटनाकारांचा मोठा दूरदृष्टीकोन होता ,राज्यकर्ते संविधानातील तरतुदींचा काटेकोर ...ल करून विकासाची फळे सर्व सामान्य जनतेला मिळवून देऊन त्यांनादेखील राजकीय दृष्ट्या विकसित करतील परन्तु झाले भलतेच सर्वसामान्य मतदार लोकशाहीच्या खऱ्या लाभांपासून वंचितच

राहिला आहे जे नेते लाभले ते क्वचितच जनतेचा राजकीय विकास झाला पाहिजे या भूमिकेचे निर्माण झाले , बहुसंख्य राजकीय नेत्यांनी आपले राजकीय लाभ कायम ठेवण्यासाठी ऐतिहासिक वारसा ,आर्थिक समृध्दता ,गुंडगिरी ,घराणेशाही, जात, धर्म,प्रदेशवाद ,सहकाराच्या आडचे अदृश्य राजकीय वलय ,आणि घटनात्मक मार्गाचा अवलंब इत्यदी मार्गाचा वापर केला यातील घटनात्मक मार्गाचा पुरेपूर वापर करून लोकांना राजकीय दृष्ट्या आपलेसे करणारे नेते फारच कमी आहेत थोडक्यात भारतीय घटनाकारांनी जी लोकशाही ज्या अपेक्षेने राज्यकर्त्यांकडे सोपविली ती लोकशाही कधी भारतात अवतरलीच नाही,फक्त काही कुटुंबांकडे भारताची राजकीय सत्ता केंद्रित झाली सर्व सामन्यांची लोकशाही फक्त मतदानापुरतीच उरली, आजही कित्येक लोकांनी जिल्हा परिषद ,विधानसभा ,संसद यांचे प्रत्यक्ष दर्शनही घेतलेले नाही .राजकारण म्हणजे मतदान एवढेच लोकांना माहित आहे . एकदा मतदान झाले की , लोक राजकारण, सत्तासंघर्ष विसरतात त्याचाच फायदा आजवर भारतातील राजकीय नेत्यांनी घेतला परिणामी भारतीय लोकशाही काही राजकीय नेते ,राजकीय घराणे व राजकीय संघटना यांच्या भोवतीच फिरते आहे .काही लोकांना कार्यकर्ते म्हणून मिरवता येते हीच काय ती आपल्या लोकशाहीची जमेची बाजू आहे.

या सर्व परिस्थितीवर भाष्य करीत असतांना एका ठिकाणी असे उदाहरण दिले जाते कि भारतीय नेतृत्व म्हणजे तीन मित्रांच्या गोष्टीसारखे आहे ती गोष्ट अशी कि तीन मित्र असतात त्यापैकी एक अतिशय हुशार असतो दुसरा घोकमपट्टीवाला आणि तिसरा जेमतेम. पहिला जो अभ्यासात हुशार होता तो दहावीला पहिला आला त्याचा डीएड ला प्रवेश होऊन तो पटकन शालेय शिक्षक बनला, जो घोकंपट्टी वाला होता तो बी.ए .पर्यत पोहचला स्पर्धा

परीक्षा देऊन शिक्षण अधिकारी झाला तो मास्तरचा ऑफिसर बनला तिसरा मित्र ज्याला काहीच येत नव्हते तो दहावीतच नापास झाला त्याची गळती होऊन त्याने शाळा सोडली गावात राजकारणाकडे वळला आधीच दांडगट त्याला राजकारणाची जोड ,पंचायत जिल्हा परिषद करत , विधानसभा त्याने गाठली तडजोडीच्या राजकारणातून शिक्षण मंत्री देखील झाला तो आता राज्याचे शैक्षणिक धोरण ठरवतो अगोदरच्या दोन्ही हुशार मित्रांचा तो राजकीय अधिकारी आहे आताच्या भारतीय राजकीय नेतृत्वाची अवस्था अशीच आहे कारण नवे नेतृत्व विकसित होऊच दिले जात नाही त्यामुळे भारतीय लोकशाही खरच लोकशाही आहे काय असा प्रश्न उभा राहतों जे राजकारणी आहेत ते काही सन्माननीय अपवाद वगळता ,आर्थिक धनदांडगे ,थोर पुरुषांचा वारसा सांगणारे, घराणेशाहीतले,पोलीस रेकॉर्ड प्रमाणे आरोपी असलेले ,बहुसंख्य नेते वर्षानुवर्ष राजकीय पदांवर चिटकून असून नव्या नेतृत्वाला संधीच नाही, मग यात लोकशाही ,जी जास्तीत जास्त लोकांना जास्तीत जास्त सत्ता सहभागाची संधी देते हा सिद्धांत खोटा ठरतोय ,इथे तर कमीत कमी लोकांना जास्तीत जास्त सत्तेचे लाभ मिळतांना दिसतात, बहुसंख्य लोक सत्तेच्या उपभोगापासून,निर्णय प्रक्रीयेपासून वंचित आहेत. अशीच व्यवस्था कायम राहिली तर लवकरच भारतात झुंडशाही अवतरेल यांत शंका नाही म्हणून भारतातील लोकशाही कायम ठेवून ती प्रगल्भ बनवावयाची असेल तर खालील उपाय योजना करणे आवश्यक आहे .

**१.राजकीय पद एका व्यक्तीला एकच व एकदाच उपभोगता येईल :**

भारतात गावातील ग्रामपंचायतीच्या सरपंचापासून ते राष्ट्रपती पदापर्यंत जी राजकीय पदे आहेत.ती राजकीय पदे मिळवण्यासाठी प्रत्येक नागरिकास अधिकार आहे .पण जी कोण व्यक्ती या पदावर जाईल ती व्यक्ती विशिष्ट कारणास्तव त्याच पदाला गोचीडासारखे

चिटकून असतात .अर्थात यामध्ये लोक भावनेने समाजासाठी आयुष्य वेचणारे काही सन्माननीय अपवाद सोडले तर अनेक जण सन्मान ,स्वार्थ यासाठी या न त्या कारणाने ते पद स्वताकडे कसे ठेवता येईल यासाठी सतत प्रयत्नशील राहून अशी पदे स्वत:च हयातभर उपभोगतात .त्यामुळे अन्य लोकांना ते पद संपूर्ण कारकिर्दीत उपभोगता येत नाहीत .शिवाय जे पदावर कायम असतात त्यांचा लोकावर दबदबा सुरु होतो हे लोक लोकसेवकाऐवजी कायम लोकमालक असल्याच्या अविर्भावात वागतात ,शासकीय अधिकाऱ्यांना स्वताचे नोकर समजू लागतात ,ही राजकीय मुजोरी व मिजासखोरी नष्ट करावयाची असेल तर प्रत्येक नागरिकाला कोणतेही राजकीय पद आयुष्यातून केवळ एकदाच ते देखील केवळ पाच वर्षासाठीच उपभोगता येईल अशी उपाययोजना करावी त्यासाठी प्रसंगी घटनादुरुस्ती करावी ,जे खरोखरच जनसेवेचे कैवारी असलेले खरेखुरे लोकसेवक असतील त्यांनी या बाबतीत पुढाकार घेऊन या नव्या प्रयोगाची सुरुवात स्वत:करून आदर्श निर्माण करावा .म्हणजे नव्या नेतृत्वाला संधी मिळेल केवळ सतरंज्या उचलणारे निर्माण होणार नाहीत .त्यांनाही आपल्या नव कल्पना राबवण्याची संधी मिळेल परिणामी लोकशाही बळकट होईल.

**२. कौटुंबिक राजकीय वारसा नको :**

आपल्याकडे पूर्वी राजेशाही होती राजाचा मुलगा राजा ही त्यावेळीची पद्धती होती कारण त्यवेळेस जो राजा होता तो सार्वभौम असे त्यामुळे त्याच्या कुटुंबाकडे अधिकार वंश परंपरेने चालत येत असत तो राजेशाहीचा संस्कार आपल्या हाडामासात एवढा मुरला आहे कि अलीकडे एखाद्या राजकीय पद प्राप्त राजकारण्याच्या घरात लगेच युवा नेते तयार होतात महिला आघाडीच्या प्रमुख तयार होतात लोकही त्यास मूक संमती देतात अर्थात यामध्ये काही स्वकर्तृत्वावर पुढे आलेले काही सन्माननीय

अपवाद असतात हे नक्की .पण काहीही असले तरी एकाच घरातील राजकीय वारसा असल्यास इतर नव्या कर्तृत्वास संधीच मिळत नाही म्हणून जास्तीत जास्त लोकांचा जास्तीत जास्त राजकीय सहभाग हे तत्व येथे पायदळी येते म्हणून ही परीस्थिती बदलायची असेल तर ज्याकुटुंबातील एका व्यक्तीने एखादे राजकीय पद प्राप्त केले आहे अशा कुटुंबातील व्यक्तीला कोणत्याही परिस्थितीत राजकीय पद मिळणार नाही अशी तरतूद नियमावलीत केली पाहिजे .जेणेकरून ,अन्य कुटुंबातील अन्य कर्तृत्ववान व्यक्तीस नेतृत्व करण्याची संधी मिळेल.व खरोखरच लोकशाही अस्तित्वात येईल भारतीय राजकारणातील कौटुंबिक मिजासवाद संपेल.व एकाच घरात अनेक किंवा सर्व राजकीय पदे प्राप्तीची लालसा नष्ट होऊन लोकशाहीचा आवाज बुलंद होईल .

**३.निवडणूक लढविण्यासाठी सी इ टी परीक्षा पास होणे आवश्यक:**

भारतात निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची शिक्षण विषयक पात्रता हा एक विनोदाचा आशय बनला आहे.गुंडगिरी ,दादागिरी ,चमकोगिरी ,चमचेगिरी,धर्म व जातीमधील अभिजनक्षमता ,पैसा ,निवडणूक जिंकण्यासाठी वैध अवैध मार्गांचा वापर करण्याची क्षमता ,वरिष्ठांच्या पायचाटूपणा अशा पात्रता सध्या निवडणूक लढविण्याच्या पात्रता समजल्या जातात अशा पात्रतेची माणसे राजकीय अधिकार पदावर गेल्यानंतर काय दिवे लावतात आपण पाहतोच, 'खाण तशी माती किंवा पेराल तसे उगवते' ज्या पात्रतेची व्यक्ती निवडून जाणार त्या पद्धतीचा ती विचार करणार त्याला जे माहित आहे तेच करणार म्हणून देशाच्या राजकीय व्यवस्थेतील निवडणुकांसाठी स्तराप्रमाणे राजकीय पद पात्रता चाचणी पास होणे (चवसपजपबंस समअमस बवउउवद मसपहपइपसपजल जमेज ) आवश्यक करावे ही परीक्षा निवडणूक आयोगाने निवडणुकीच्या सहा महिने अगोदर घ्यावी ,या परीक्षेत निवडणुकीच्या स्तराप्रमाणे प्रश्न

असावे व मेरीट प्रमाणे निकाल घोषित करावा जेणेकरून राजकारण प्रशासन यांची माहिती असणारा लोकप्रतिनिधी लोकांना मिळेल नाहीतर नोकरशाहीतील लोकच सध्याच्या सामान्य जनतेच्या सामान्य लोकप्रतिनिधींना काही उमजू देत नाहीत .विशिष्ट पात्रता परीक्षा पास असल्याने माहितगार लोकप्रतिनिधी मिळतील लोकशाही मजबूत बनेल

**४.उमेदवारांसाठी शैक्षणिक पात्रता व राजकीय साक्षरता प्रशिक्षण वर्ग आवश्यक :**

प्रत्येक निवडणुकीसाठी उमेदवारांसाठी पुरेशी शैक्षणिक पात्रता हवी कारण धोरण निर्धारिण व कायद्याची अंमलबजावणीसाठी अधिकारपदावरील व्यक्ती पुरेशा प्रमाणात जाणकार हवी यासाठी विशिष्ठ शैक्षणिक पात्रता गरजेची असते म्हणून ग्रामपंचायत करिता सदस्यांसाठी किमान दहावी सरपंच पदासाठी पदवीधर जिल्हापरिषद विधानसभा संसद यासाठी किमान पदवीधर उमेदवार हवेत नाहीतर नोकरशाहीतील लोक या लोकप्रतिनिधींना उल्लू बनवतील व भ्रष्ट्राचारी कारभार सुरु होईल म्हणून पुरेसे शिक्षित लोक हवेत त्याचबरोबर निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना राजकीय साक्षरता प्रशिक्षण वर्ग पूर्ण करणे अनिर्वार्य केले जावे ज्यामध्ये सभागृहातील कामकाज ,कॉम्पुटर ,इत्यादींचे प्रशिक्षण प्रतिनिधिक स्वरुपानुसार किंवा स्तरानुसार आठ दिवस ते एक महिना अशा कालावधीतील प्रशिक्षण पूर्ण करणे अनिर्वार्य करावे हे प्रशिक्षण जिल्हास्तरावरील उदा.ग्रामपंचायत पंचायत समिती जिल्हा परिषद यातील लोकप्रतिनिधी साठी प्रशिक्षणाशिवाय पगार, भत्ते मिळणार नाहीत अशी तरतूद करावी हे प्रशिक्षण जिल्हा पातळीवरच्या लोकप्रतिनिधींसाठी विविध महाविद्यालयातील राज्यशास्त्राच्या प्राध्यापकांच्या समितीव्दारे तर विधानसभा ,संसद यासाठी विद्यापीठातील राज्यशास्त्र विषयाच्या तज्ज्ञांकडून दिले जाईल याचीही तरतूद असावी असे झाल्यास योग्य

निधी तयार होऊन अधिक सक्षमपणे राज्यकारभार चालविता ईल ,लोकशाही **प्रबळ होईल** .

**तज्ञ लोकांकडून उमेदावारांना क्रेडीट श्रेणी :**

निवडणूक लढविणारे उमेदवार मग भलेही ते पात्रता चाचणी स झाले असतील अशा उमेदवारांसाठी समाजातील तज्ञ लोकांकडून निवडणूक पूर्व क्रेडीट श्रेणी दिली जावी जेणेकरून सामान्य लोकांना उभे राहणाऱ्या उमेदवारांमधून नेमका कोण कसा आहे याची ओळख निर्माण होईल त्यासाठी समाजातील पत्रकार वकील,शिक्षक ,साहित्यिक ,पोलीस ,डॉक्टर ,शासकीय अधिकारी यांची समिती निवडणूक आयोगाने नेमून देऊन त्याचा अहवाल सार्वजनिक ठिकाणी लावला जावा या अहवालात उमेदवाराची सामाजिक राजकीय पार्श्र्वभूमी वर आधारित ग्रेड असतील ज्या उमेदवारांना वरची श्रेणी मिळेल त्या उमेदवारास निवडून देण्यचे आवाहन ही समिती करेल यामुळे कोण उमेदवार कोणत्या पात्रतेचा आहे हे मतदारांना कळेल व मतदानाच्या वेळेस मतदान करतांना योग्य तो उमेदवार निवडणे सोपे जाईल यामुळे गुन्हेगारी पार्श्र्वभूमीचे लोकप्रतिनिधी सभागृहांमध्ये येण्यापासून वाचेल आणि योग्य व कार्यक्षम लोकप्रतिनिधी सभागृहात येतील ज्यांना जनतेचा पैसा योग्य कामासाठी व योग्य कारणासाठी खर्च करावा याची जाण राहील शिवाय समाजातील तज्ज्ञ लोकांच्या मताला किमंत मिळेल परिणामी उदासीन असलेला बुद्धीजीवी वर्ग लोकशाहीच्या पवित्र प्रवाहात सामावला जाईल व लोकशाही बळकट होण्यास नक्की मदत मिळेल

**६.मतदान व निवडणुकीस उभे राहणे फक्त जन्माने रहिवाशी असलेल्या घटक राज्यातच :**

भारतीय लोकशाहीने व राज्य घटनेने नागरिकांना मतदानाचा व निवडणुकीस उभे राहण्याचा किंवा निवडणूक लढविण्याचा

मौल्यवान हक्क बहाल केलेला आहे ज्यायोगे लोकशाहीत सत्ता सहभागाचा आनंद मिळावयास हवा होता परन्तु किती भारतीय नागरिकांना हा आनंद मनमुरादपणे आजपर्यंत घेता आला हा संशोधनाचा विषय आहे ,सध्याची परस्थिती लक्षात घेता असे दिसून येते कि काही प्रतिष्ठित नेते स्वत:च्या पराभवाच्या भीतीपायी अनेक मतदार संघात निवडणूक लढवितात समजा हे नेते दोन्ही ठिकाणी निवडून आले तर त्यांना एका ठिकाणाचा राजीनामा द्यावा लागतो त्यामुळे जनतेचा वेळ व पैसा दोन्ही वाया जातात शिवाय भारतात व्यवसाय स्वातंर्त्य असल्यामुळे नागरिक विविध घटक राज्यांमध्ये नोकरी व्यवसायानिमित्त स्थलांतरित असतात अशा स्थलांतरित लोकांची संख्या लक्षणीय असल्यामुळे अशा लोकांचा .काही राजकीय श्रेष्ठीजन स्वताच्या राजकीय स्वार्थापायी वापर करून घेतात स्थलांतरित लोकांची मतदार नोंदणी ,त्यांचे रेशन कार्ड व इतर सोयींसाठी हे लोक जाणीव पुर्वक प्रयत्न करून स्वतासाठी एकगठ्ठ मतदानाची तरतूदच करतात हे आपल्या लोकशाहीला घातक आहे त्यामुळे अशा स्थलांतरित लोक जर त्या गावाच्या लोकसंख्ये पेक्षा अधिक झाले तर हा स्थानिक मतदारांवर अन्याय आहे हे लोकशाहीला धोकेदायक ठरू शकते म्हणून भारतात ज्या घटक राज्यात तो मतदार जन्माला आला असेल केवळ त्याच घटक राज्यात त्याला मतदान करता येईल अशी निवडणूक सुधारणा झाली पाहिजे ,त्याचबरोबर ज्या कोणा व्यक्तीला निवडणूक लढवायची असेल त्याला फक्त तो ज्या घटकाराज्याचा जन्माने रहिवाशी असेल अशाच राज्यात त्याला निवडणूक लढविता येईल अशी निवडणूक विषयक सुधारणा व्हावी जेणेकरून स्थानिक मतदार खरोखरच लोकशाही प्रक्रियेचा भाग बनेल व जास्तीतजास्त स्थानिक लोक लोकशाहीचा आनंद घेतील सध्या इतर राज्यातील उपरे नेते व मतदार विरुद्ध स्थानिक नेते व मतदार असा संघर्ष होऊन ते लोक

लोकशाहीच्या मंगल प्रवाहाचे रुपांतर प्रदेशवादाच्या गटारात करतांना दिसतात म्हणून मतदान व निवडणूक लढविणे हे केवळ जन्माने अधिवाशी असलेल्या घटक राज्यातच व्हावे.राज्याबाहेर असलेल्या मतदारांसाठी पोस्टल मतदान,online voting असे पर्याय व मतदानास जाण्यासाठी भरपगारी रजा अवश्य द्यावी. ज्या राज्यामधील मतदार असेल त्या त्या घटक राज्यांनी आपल्या मतदारासाठी वाहतूक भत्ता दिला तरी चालेल,पण पोटार्थी लोकांसाठी स्थानिक मतदारांवर अन्याय नको . या उपाय योजनेमुळे जागोजागी जी कंपूशाही निर्माण झाली आहे ती उध्वस्त झाल्याशिवाय राहणार नाही भारतीय लोकशाहीला सुगीचे दिवस येतील .

**७.मतदारांसाठी मतदान भत्ता :**

आपल्या लोकशाहीने आपणास मतदानाचे पवित्र काम करण्यासाठी मतदानाचा महान हक्क बहाल केलेला आहे, एवढेच नव्हे मतदान करण्यासाठी भरपगारी सुटी मिळते ,अर्थात हि सुटी फक्त जे मतदार शासकीय निमशासकीय खाजगी संस्थांमध्ये संघटीत रूपाने काम करतात त्यांनाच मिळते परंतु असंघटीत क्षेत्रातील कामगार ,मजूर ,भूमिहीन ,शेतमजूर,बेकार ,घरकाम करणाऱ्या व्यक्ती यांना अशी सुटी मिळतेच असे नाही त्यांचे पोट हातावर असल्याने मतदानासाठी रोजगार बुडविणे त्यांना परवडत नाही ,म्हणून असे लोक लोकशाही प्रक्रियेपासून दूर राहणे पसंत करतात अशा लोकांना विविध राजकीय गट आर्थिक प्रलोभने देऊन मतदानासाठी तयार करतात हा लोकशाहीचा सरळ सरळ विश्वासघात आहे परिणामी असा मतदारही निवडणुकीत विविध गटांकडून मिळणाऱ्या खिराफतीसाठी निवडणुकीची वाट पाहतात थोडक्यात यामुळे मत खरेदी विक्री व मतांचा बाजार मांडला जातो कारण ज्यांना भरपगारी निवडणूक रजा मिळत नाही असे लोक निवडणुकीतील अनैतिक मार्गांना बळी पडतात त्याची लागण इतर लोकांनाही आता

होऊ लागली आहे ,ही परिस्थिती बदलण्यासाठी ज्या मतदारांना कोणताही पगार मिळत नाही अशा मतदारांना ज्यामध्ये घरकाम करणाऱ्या महिला ,बेकार भत्ता नसलेले तरुण ,विद्यार्थी ,असंघटीत क्षेत्रातील नियमित पगार नसलेले कामगार ,मजूर ,शेतमजूर ,अल्पभूधारक शेतकरी इत्यादींचा समावेश असेल अशा मतदारांना निवडणूक भत्ता निवडणूक आयोगाने सरकारने द्यावा ,त्यासाठी थोडा खर्च झाला तरी तो जनतेवरच होईल पैसा जनतेचाच असतो,

असा निवडणूक भत्ता देण्या मागची भूमिका अशी आहे कि जे शासकीय निमशासकीय खाजगी नियमित नोकर आहेत त्यांना भरपगारी रजा मिळते ,बरेचसे महाभाग ज्या कामासाठी रजा मिळते ते काम न करता पिकनिकसाठी ही रजा वापरतात ज्यांना अशी रजा मिळत नाही ते लोक विविध आर्थिक प्रलोभंनाना बळी पडून मतदान करतात तेही स्वतयची सदसदविवेकबुद्धी गहाण ठेवून यामुळे विशिष्ट राजकीय गटांचे फावते त्यांना हवा तो उमेदवार घोडेबाजार करून निवडून आणता येऊ शकतो हा लोकशाहीचा अपमान व विश्वातघात आहे हे बदलण्यासाठी जे मतदार नियमित पगार नसलेले आहेत त्यांना किमान एका दिवसाची मजुरी मिळेल एवढा निवडणूक भत्ता दिला जावा जेणे करून लोक अन्य कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता सरकारी निवडणूक भत्ता घेऊन अभिमानाने ,स्वमर्जीने मतदान करतील ,निवडणूक पारदर्शक होण्यास मदत होईल , निवडणुकीची भर पगारी रजा ,घेऊन ,आणि निवडणूक भत्ता घेऊन मतदान न करणाऱ्यांविरुद्ध राष्ट्रदोहाचा आरोप ठेवून जबर शिक्षा दिली जावी .म्हणजे प्रत्येक मतदार मतदान करेल मग ते मतदान 'नोटा' ला (NOTA) का असेना ,जो मतदार नोकरदार असेल अशा ने मतदानाचा पुरावा दिल्याशिवाय ,दाखविल्याशिवाय त्यास वरिष्ठ यांनी कामावर घेऊ नये .थोडक्यात भारतीय लोकशाही गरिबी व बेकारी मुळे आर्थिकदृष्ट्य दांडगट पण

परीस्थितीत निर्माण झालेले अपघात व निर्माण केलेले घातपात यामुळे नागरिकांचे जीवन धोक्यात येऊन ते भयग्रस्त अवस्थेत जगतात त्यांना सामजिक सुरक्षा प्रदान करण्याच्या हेतूने प्रत्येक मतदारसंघातील सर्व मतदारांचा विमा त्या मतदार संघात जे राजकीय पक्षाचे व अपक्ष उमेदवार निवडणूक लढवितात त्यांची जी अनामत रक्कम असते त्या रकमेतून सर्व मतदारांचा विमा उतरवला जावा या विम्याचा कालावधी निवडणूक अधिसूचना निघाल्यापासून ते नवीन सरकार येऊन आठ दिवस होईपर्यंत असावा .या काळात जर मतदारास काहीही झाले तरीत त्यास नुकसान भरपाई विम्याच्या माध्यमातून मिळेल याची व्यवस्था केली जावी वाटल्यास यास सध्याच्या राष्ट्रीय विमा योजनेची जोड द्यावी .अशी पद्धती राबविल्यामुळे निवडणुकीसाठी भरावी लागणारी अनामत रक्कम वाढेल जे हवसे नवसे निवडणुकीस विनाकारण उभे राहतात ,डमी म्हणून निवडणुकीचा अर्ज भरतात त्यांना चाप बसेल आणि नागरिकांना विमा कवच लाभल्याने ते निर्भयपणे मतदान करू शकतील परिणामी लोकशाही अधिक बळकट होईल .

**९.नोटाला ४०टक्के मतदान मिळाल्यास निवडणूक रद्द :**

भारतात सध्याच्या निवडणूक प्रक्रियेत लोकांना निवडणुकीत उभे राहणाऱ्या उमेदवारांना नापसंती व्यक्त करण्यासाठी NOTA चा पर्याय देण्यात आलेला आहे उमेदवाराची राजकीय सामाजिक कार्य कौशल्य नसतानाही केवळ PCET पास झाला म्हणून किंवा पक्षाने निर्णय घेऊन उमेदवार थोपविल्यास किंवा जनतेची नाराजी असल्यास नोटा चा वापर केला जातो परंतु जर नोटा ला जर ४०टकके पेक्षा अधिक मतदान झाले तर त्याठिकाणी फेर निवडणूक घेतली जावी अशी फेरनिवडणूक घेत असतांना अगोदर जे उमेदवार उभे होते त्यापैकी कोणालाही निवडणूक लढविण्यास परवानगी मिळणार नाही अशी व्यवस्था निवडणूक आयोगाने करावी जेणेकरून

योग्य ते उमेदवार निवडून जाण्यास मदत होईल लोकांनाही एक सक्षम पर्याय नोटा मुले मिळेल व लोकशाही बळकट होण्यास मदत होईल

वरील उपाय योजना व्यतिरिक्त लोकप्रतिनिधींच्या कामाचा दर वर्षांनी आढावा घेणे ,सार्वजनिक कामाचा जाहिर रित्या हिशेब किंवा अहवाल देणे यासारख्या उपाययोजनांची अंमलबजावणी झाल्यास भारतीय लोकशाही बळकट होऊन भविष्यात कोणाचीही अधिककाळ सत्तेची अंडी उबवण्याची हिम्मत होणार नाही व वर्षानुवर्ष प्राप्त झालेल्या ,प्राप्त केलेल्या सत्तेमुळे काही राज्यकर्त्यामध्ये निर्माण झालेली सत्तेची मग्रुरी नष्ट होऊन खरे खुरे लोकसेवक ,लोकनेते उदयास येऊन भारतीय लोकशाहीचा वटवृक्ष नक्कीच फोफावेल यात शंका नाही .कोणत्याही नेत्याचा पक्षाचा ,राजकीय गटाचा ,व्यक्तीचा मानभंग तेजोभंग करणे हा या लेखाचा उद्देश नाही या लेखामुळे किंवा त्यातील घटकामुळे कोणाच्या भावनांना क्षति पोहचत असल्यास त्यासाठी क्षमस्व ,भारतीय लोकशाहीच्या उज्ज्वल भावितव्यासाठी व प्रगल्भतेसाठी वरील उपाय योजनाची अंमलबजावणी व्हावी यासाठी खरे जनसेवक ,लोकशाहीचे पुजारी ,खरे जननायक ,अभिजन ,बुध्दीवादी,जागृत नागरिक ,मतदार प्रयत्न करतील अशी भाबडी आशा .

**संदर्भ ग्रन्थ सूची**

१.लोकशाहीचे धोके :पन्नलाल सुराणा
२.भारतीय लोकशाही शोध आणि आव्हाने :अरुण सारथी
३.भारतीय लोकशाही शासन व प्रशासन :नितीन आराटे,विजय भगत
४.भारतीय लोकशाही समोरील आव्हाने : संपादक –बाळ कांबळे
५.लोकशाही ,निवडणुका आणि सुशासन :ऋतुराज बुवा
६.भारतीय लोकशाही :अनिल दीक्षित
७.भारतीय राजकीय व्यवस्था :भागवत आणि इतर
८.भारतीय लोकशाही स्थिती आणि गती :पंडित नलावडे